
Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION
RESEARCH JOURNEY
INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
February - 2019 SPECIAL ISSUE- 155

# Rethinking Development and Displacement in India




**Guest Editor :**
Dr. V.B. Gaikwad
Principal
MVP Samaj's KRT Arts, BH Commerce, and AM Science College,
Nashik, Dist. Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue :**
Dr. Sanjay D. Savale
Mr. Dipak Shinde
Dr. Umesh Shinde
Mr. Shashikant Malode

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 155 - Rethinking Development & Displacement in India
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# विकास आणि विकासाचे सामाजिक बहिष्कारावरील परिणाम

प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना :**

विकास या संकल्पनेकडे आज आतंरराष्ट्रीय पातळीवर प्रश्न म्हणून पाहिले जात आहे. संयुक्त राष्ट्र संघाने विकासाची परिभाषा केली. ती अशी, विकासाचा अर्थ असा आहे की, सामाजिक व्यवस्था, सामाजिक संरचना, संस्था आणि समाज उपयोगी सर्व सेवांची वाढती क्षमता, जे की सर्व संसाधनांचा उपयोग करण्यासाठी अनुकूल असा समाज परिवर्तन होणे, त्यामुळे समाजाचे जीवनमान उंचावणे, मूल्य व आर्थिक प्रगती, पैसा आणि संधी ची समान वितरण होवून समाज व्यवस्थेत परिवर्तन घडून येणे म्हणजे विकास होय, असे सर्वसाधारण पणे सांगता येते.

विकास आणि विकास प्रक्रीयेत सामाजिक बहिष्काराचे वाढते प्रमाण जर लक्षात घेतले तर विकासाचे परिणाम हे समाज परिवर्तनावर झाले का, समाजामध्ये विषमता निर्माण करण्यासाठी, समाजात सामाजिक बहिष्कार निर्माण करण्यासाठी विकासाची प्रक्रिया समाजात रूजली गेली हे मात्र गुपीत समजले नाही. कारण की विकास म्हटले की, सुपर्ण समाजात उत्क्रांतीच्या दिशेने परिवर्तन होणे, समाजामध्ये स्थित्यंतरे घडून येणे म्हणजे विकास असे मानत असतांना एका बाजूला या विकासामुळे समाजात दुफळी देखील निर्माण झालेली दिसून येते. कारण की, विकासामुळे काही लोकांनीच श्रीमंतीची कास धरली आणि काहींना विकासाच्या परिघाच्या बाहेर ठेवण्यात आले. त्यामळे समाजात विषमता निर्माण झाली आणि सामाजिक बहिष्कार समाजात प्रस्थापित होत असलेला दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :–**

१. विकास ही संकल्पना समजून घेणे.
२. सामाजिक बहिष्कार संकल्पना समजून घेणे.
३. विकासाचे सामाजिक बहिष्कारावरील परिणाम समजून घेणे.

**संशोधन पध्दती :–**

शोधनिबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत पोहचतो. त्याचप्रमाणे शोधनिबंधात देखील एखादी समस्या निश्चित करून त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. त्याच प्रमाणे प्रस्तूत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**विकास संकल्पनेचा अर्थ :–**

विकास म्हणजे काळानुसार कुठल्याही गोष्टीत होणारे गुणात्मक, प्रकारात्मक किंवा दर्जात्मक अधिक्य होय. विकास शारिरीक किंवा इतर कोणत्याही संस्थेत उदा. अर्थव्यवस्था, प्रणाली इ. मध्ये होऊ शकतो. सहसा तो ठराविक एककाच्या पटीत मोजता येत नाही. विकासाच्या मोजमापासाठी वेगळे निकष लावावे लागतात.



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 155 - Rethinking Development & Displacement in India
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

काळानुसार अधिक्य होणे हे वाढ आणि विकास या दोन्हीमध्ये समान असले तरी वाढीत प्रमाणात्मक व विकासात गुणात्मक अधिक्य अभिप्रेत आहे.

मोठ– मोठी महानगरे, शहरे, प्रचंड कारखाने आणि उद्योग, आकाशात भिडणाऱ्या उंचउंच इमारती, आधुनिक विज्ञानाने आणि तंत्रज्ञानाने मानवाला उपलब्ध करून दिलेल्या सोयी यांची रेलचेल या गोष्टी आपण विकास या नावाने ओळखतो. 'पश्चिमेकडील विकसित देश' असे ज्यावेळी आपण म्हणतो त्यावेळी सुध्दा आपल्या मनात हाच अर्थ असतो. एका दृष्टीने तांत्रिक आणि औद्योगिक प्रगती म्हणजे विकास अशी विकासाची सर्व सामान्य व्याख्या मान्यता पावली आहे.

अर्थशास्त्राने विकास अथवा प्रगतीच्या मापनाचे काही निकष ठरविले आहेत. मोजमाप करावयाचे म्हणजे, ज्याचे मापन करता येते. अशाच गोष्टीचा विचार अर्थशास्त्रात केल्या जातो. आणि म्हणून हे मोजमाप फक्त भौतिक गोष्टीचेच होऊ शकते. माणूस वापरत असलेल्या विविध वस्तूंचे वजन वा संख्या, त्यांची पैशातील किंमत अशाच गोष्टीचे मोजमाप करून त्या आधारे प्रगती किंवा विकास या विषयी बोलल्या जाते. विकास हे वेगवेगळया निकषांच्या आधारे समजून घेता येतो. आज भारताच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील विकास ही प्रक्रिया समजून घेतल्यास असे लक्षात येते की, भारतातील संपूर्ण व्यवस्थेत बदल झालेला दिसून येतो. परंतु त्यांच पध्दतीने समाज व्यवस्थेत बदल झालेला दिसून येत नाही. कारण की, काही समुदायाची आर्थिक व्यवस्थेवर मक्तेदारी असल्यामुळे तो समाज केंद्रस्थानी आला आणि अत्यंत गरीब जनता आजही परिघाच्या बाहेर असल्याचे दिसून येते, ही फार मोठी विषमता आजच्या २१ व्या शतकात ही आपणास दिसून येते. या विकास प्रक्रियेत समाजामध्ये सामाजिक बहिष्कार आपणास सार्वत्रिक स्वरूपात दिसून येते. आजही मागास, वंचित, दलित आणि परिघाच्या बाहेर असलेल्या समाजावर अन्याय, अत्याचार, जूलूम होत असतांना दिसून येते. काही ठिकाणी प्रभूत्वशाली जाती गटाकडून कनिष्ठ जाती समूहांवर सामाजिक बहिष्कार होत असलेला दिसून येत आहे. विकासाची ध्येय जरी साध्य होत असली तरी सामान्य जनतेसाठी या विकासाचे ते साक्षी होवू शकत नाही. कारण की, आजही त्यांना विकासापासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न समाजात होत असलेले दिसून येते.

**सामाजिक बहिष्काराचा अर्थ :–**

'सामाजिक बहिष्कार' याचा अर्थ समाजाच्या सदस्यांमध्ये कोणताही सामाजिक भेदभाव करणारी कृत्य– मग ते मौखिक किंवा लेखी स्वरूपातील असो हे सर्व कृत्य म्हणजे सामाजिक बहिष्कार होय.

Tj कोणताही सदस्य किंवा सदस्यांचा समूह पुढीलपैकी कोणतेही कृत्य किंवा कृत्ये करील, अशा कोणत्याही सामाजिक सदस्यांच्या समूहाने समाजातील सदस्यावर सामाजिक बहिष्कार घातला असल्याचे मानण्यात येईल, म्हणजे :–

१. जर तो आपल्या समाजातील कोणत्याही सदस्यास कोणत्याही सामाजिक वा धार्मिक रुढी, रितिरिवाज वा विधी यांचे पालन करण्यास अथवा सामाजिक, धार्मिक वा सामूहिक कार्यक्रम, पार्थना सभा, समाज मेळावा, सभा किंवा मिरवणूक यांमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध करील किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील;

२. जर तो, त्याच्या स्वतःच्या समाजातील सदस्य बहुतकरुन व सर्वसाधारणपणे पार पाडतात असे विवाह, अंत्यविधी किंवा इतर धार्मिक समारंभ आणि विधी संस्कार पार पाडण्याचा त्याच्या समाजातील



Scanned with OKEN Scanner

कोणत्याही सदस्याचा हक्क नाकारील किंवा तो नाकबूल करील अथवा तो नाकारण्याची किंवा नाकबूल करण्याची व्यवस्था करील;

३. जर तो, आपल्या समाजातील सदस्याचे जगणे दुःखी कष्टी होईल अशा तऱ्हेने त्या सदस्याला त्या समाजामध्ये सहभागी करुन घेण्यास टाळाटाळ करील अथवा नकार देईल किंवा अशा सदस्याशी असलेले सामाजिक किंवा व्यावसायिक संबंध तोडील;

अशा प्रकारचे अनेक निकष या सामाजिक बहिष्कारात विनिर्दिष्ट केलेली आहेत. या मधील कोणत्याही कृत्याशी संबंधीत कृत्य एक व्यक्ती अथवा समाज, समूदायाकडून घडून आल्यास त्यांना कायदेशीर शिक्षा केली जाते. या कायद्यामुळे समाजातील सर्व सामान्य जनतेला सद्यपरिस्थितीत मोकळेपणाने जीवन जगता येते.

सामाजिक बहिष्काराचे प्राबल्य हे भटक्या, विमुक्त, आदिवासी या समूदायात मोठया प्रमाणात असलेले दिसून येते. या समूदायात जातपंचायतीचे प्रभाव देखील फार मोठया प्रमाणात असते. कारण जातबाहय वर्तन केल्यास जातपंचायत आरोपीस प्रमाण, इमान किंवा दिव्य करण्याचे आदेश देते. या सत्र पुराण–कथाधिष्ठित किंवा धर्माधिष्ठित सांस्कृतिक रूढी–परंपरांमुळे तिचा जनमानसावरील पगडा जबरदस्त आहे. जातपंचायत ही जातीची केवळ न्यायसंस्थाच नाही तर जातीमधील व्यक्तींच्या व्यवहाराचे नियमन करणारी ती एक शासनयंत्रणाही आहे. परंतु जातपंचायत विरोधी कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्यांना मुख्य प्रवाहात यावे लागेल. म्हणजे कोणत्याही अन्यायाविरोधात दाद मागण्यासाठी पोलिसांत तक्रार द्यावी लागेल. न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतील. सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायद्याच्या मुख्य उद्देशापैंकी, शोषण थांबावे हा एक उद्देश आहे, तर या वर्गातील व्यक्ती पोलीस ठाण्यात गेली किंवा न्यायालयात, म्हणजे सरकारी वकील/कारकुनाकडे गेली तर तिचे मानसिक, आर्थिक शोषण होणार नाही, याची हमी देण्याची जबाबदारी राज्यघटनेनुसार शासन–प्रशासनावर आहेच, तरीही, या नव्या व्यवस्थेत त्यांचे शोषण होऊ नये यांसाठी पूर्वतयारी आवश्यक आहे. तेव्हा मात्र सामाजिक बहिष्कार काही काळानंतर कमी होत असतांना दिसून येईल.

**सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा– अंनिसचे योगदान :–**

हा कायदा अस्तित्वात आणण्यासाठी सरकार आणि शासनाला सर्वेतोपरी पुरावे सादर करुन कायदा मंजूर करुन घेतला आणि मागासवर्गीय, भटक्या जाती–जमातीतील जात पंचायतीचे निर्मूलन करण्याचे कार्य महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने सर्व कार्यकर्ते आणि विशेष म्हणजे अविनाश पाटील – अध्यक्ष, अनिस यांनी हे समाज परिवर्तनाचे कार्य केले. सामाजिक बहिष्कार हे जात पंचायतीत मोठया प्रमाणात घडून येत असत. त्यामुळे अनिस नी प्रथम राज्यातील १५ जात पंचायती बरखास्त करुन अनिस ने जात पंचायत साठी मूठमाती अभियान राबविले. त्यात पोलिस यंत्रणेचे सहकार्य मिळाले. या निमित्ताने राज्यभरातील जात पचायतीचा कारभार चव्हाट्यावर आला. पीडित कुटुंबे आपली व्यथा मांडू लागले. त्यात अशिक्षित जसे होते, तसे काही सुशिक्षितही होते. या विरोधात संतप्त भावना व्यक्त होऊ लागल्यानंतर अनेक जात पंचायतीनी स्वतःहून त्या बरखास्त करण्याची भूमिका घेतली. आजवर राज्यातील भटके जोशी, स्मशान जोगी, आदिवासी गोंड, वैदू, नागपंथी डवरी गोसावी, गोपाळ, मढी यासह १५ जात पंचायती बरखास्त करण्यात यश आले आहे.

आज या कायद्यामुळे सर्व सामान्य जनतेच्या मनामध्ये भिती निर्माण झालेली दिसून येते. आणि काही प्रमाणात देखील सामाजिक बहिष्काराचे कृत्य घडून येण्याचे प्रमाण देखील कमी होत असलेले दिसून येत आहे. कारण की, सर्वांना हे कळून चुकले आहे की, सामाजिक बहिष्कार आता कायदेशीर गुन्हा आहे, त्यामुळे जागृक लोक आता सावध होवून या प्रकियेतून दूर राहण्याचा प्रयत्न करीत असलेले दिसून येत आहे.



Scanned with OKEN Scanner

विकासाचे सामाजिक बहिष्कारावरील परिणाम :–

आज २१ व्या शतकात संपूर्ण देशात परिवर्तन होत असलेला दिसून येते. भारतीय समाज असेल किंवा अन्य देशात देखील विकास होत आहे, असे म्हणाता येईल. परंतु या विकासाच्या प्रकियेत आजही काही घटक अन्य बाबतीत विकासापासून वंचित असलेला दिसून येत आहे. प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या समाज व्यवस्थेत सामाजिक समस्या देखील निर्माण झालेल्या दिसून येते. सामाजिक बहिष्काराशी संबंधित काही समस्या समाजात सहजरीत्या निर्माण होतात. आज बेरोजगारी, अकुशल कौशल्य, उत्पन्नाचे कमी प्रमाण, निकृष्ट घराचा दर्जा, पर्यावरणातील वाढते गुन्ह्याचे प्रमाण, आरोग्याच्या समस्या आणि कुटुंबातील विघटनात्मक समस्या अशा अनेक समस्या समाजात आढळून येत आहेत. विकास आणि सामाजिक बहिष्कार या परस्परविरोधी बाजू आहेत. कारण की विकास हा संपूर्ण समाजाचा होत असताना त्यांत काही वंचित घटक हे विकासापासून दूरच राहतो. विशेषत: विकासाच्या प्रकियेत येऊ शकणाऱ्या समूदायाला विकासाच्या प्रकियेत प्रवेशच मिळत नाही. जात, धर्म, वंश, भाषा, संस्कृती इत्यांदी कारणामुळे त्यांना समाज व्यवस्थेत विषमतेच्या कारणावरुन त्यांचे शोषण करण्याचे प्रयत्न केले जाते. विकासाचे सामाजिक बहिष्कारावर परिणाम झालेले दिसून येते. कारण की, सर्वांगिण विकास साधण्याचे कार्य करणाऱ्या घटकाला प्रभूत्वशाली समाजातील काही घटक बहिष्कृत करण्याचा प्रयत्न करीत असतो. विकास प्रकियेत मुठभर लोकांच्या हातात सत्ता केंद्रे असून त्यांच्या अधिपत्याखाली अन्य समुदायातील लोक कार्य करीत आहे. परंतु अत्यंत दयनिय जीवन जगणाऱ्या, दलित, मागास, भटक्या जाती–जमातीतील लोकांवर सामाजिक बहिष्कार उच्चभ्रु लोकांच्या माध्यमातून समाजात घडून येत असते. समाजात आजही श्रीमंत हा श्रीमंत होत असतांना दिसून येते तर गरीब हा गरीबच होत असलेला दिसून येते. म्हणून ही सामाजिक व्यवस्था नष्ट होण्यासाठी सामाजिक बहिष्कार सर्व समाजातून नष्ट होणे फार गरजेचे आहे. तेव्हा मात्र विकासाचे सर्वांना समान हक्कदार बनता येईल, समाजातील विषमतावादी दृष्टिकोन नष्ट होईल व समाजातील सर्व जाती–जमातीचे सर्वांगिण विकासाचे ध्येय साध्य होऊन सर्व समुदाय प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतील. म्हणून गरज आहे की, सामाजिक बहिष्कार हे कोणत्याही समुदायावर व व्यक्तीवर समाजात घडून येवूच नये, यासाठी प्रयत्न होणे व एकसंघ समाजाची निर्मीती करणे काळाची गरज आहे. या पध्दतीने समाजाचे विकास होवू शकतो. विकासाचे परिणाम संपूर्ण समाजावर सकारात्मक पध्दतीने झाल्यास समाज परिवर्तन शिघ्रगतीने होत असलेला दिसून येईल.

निष्कर्ष :–

विकास आणि विकासाचे सामाजिक बहिष्कारावरील परिणाम समजून घेत असतांना असे लक्षात येते की, विकास या प्रकियेत समतोलत्व दिसून येत नाही. कारण की, काही जन समुदाय हा भांडवलदार म्हणून पुढे येतो तर काही विकास प्रक्रियेच्या परिघाच्या बाहेर असलेले दिसून येते. जर समाजामध्ये असलेली सामाजिक बहिष्कारांची प्रक्रिया समूळ नष्ट करावयाची असेल तर विकासाच्या बाबतीत समतोलत्व साधणे फार गरजेचे आहे. विकासापासून दूर असलेल्या समुदायाला केंद्रस्थानी आणणे व त्यांच्यात विकास घडवून परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. विकसित समुदायांनी देखील अविकसित समुदायाला सोबत घेवून परिवर्तन करण्यासाठी एकसंघ प्रयत्न करणे गरजेचे आहे, त्यामुळे विषमतावादी समाजव्यवस्था नष्ट होईल आणि त्यामुळे सामाजिक बहिष्काराची समस्या देखील समाजातून समूळ नष्ट होऊ शकेल, असे या अभ्यासावरुन म्हणता येते.

संदर्भग्रंथ :–

१. गोपी कृष्ण प्रसाद, (१९९९), विकास का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन्स, जयपूर.
2- Jane Mhieson; Social Exclusion Meaning, Measurement and experience and links to health inequalities A review of literatuatre.
3- Nabin Rawal, Social Inclusion and Exclusion: A review.
4- ekseMs izdk'k] fodkl] ifjorZu o ekuoh gDd] ukxiwj-



Scanned with OKEN Scanner